आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
१२ मार्च २०२६ - गुरुवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- आखाती युद्धामुळे उद्भवलेल्या इंधन तुटवड्यावरून विरोधकांचा आजही संसदेत गदारोळ

- लोकसभा सभापती ओम बिरलांच्या विरोधातला अविश्वास प्रस्ताव फेटाळला गेल्यावर आज सभापतींनी चालवलं कामकाज

- जम्मू काश्मीरचे माजी मुख्यमंत्री फारुक अब्दुल्ला यांच्यावरच्या हल्ल्याची सखोल चौकशी करण्याचं सरकारचं राज्यसभेत आश्वासन

- तीन अटींवर युद्ध थांबवण्याची इराणची तयारी

**आणि**

- भारताचा ध्वज असलेल्या तेलवाहू जहाजांना होर्मुझ ओलांडण्यासाठी इराणची परवानगी

**<><><><><>**

अमेरिका-इस्रायल आणि इराण दरम्यान सुरू असलेल्या युद्धामुळे निर्माण झालेल्या गॅस तुटवड्यावरून आज विरोधकांनी संसद भवन परिसरात निदर्शनं केली. लोकसभेत विरोधकांच्या निषेधाच्या घोषणांमुळे सभागृहाचं कामकाज १२ वाजेपर्यंत तहकूब करण्यात आलं. लोकसभा सभापती ओम बिरला यांच्या विरोधातला अविश्वास ठराव काल आवाजी मतदानाने फेटाळला गेला, त्यानंतर आज बिरला यांनी कामकाजाची सूत्रं हातात घेतली. अविश्वास प्रस्तावावर सभापती ओम बिर्ला यांनी आज निवेदन दिलं. स्वतंत्र भारताच्या संसदीय इतिहासात लोकसभा सभापतींविरुद्ध अविश्वास प्रस्तावावर दोन दिवस १२ तासांपेक्षा जास्त चर्चा झाली. सर्वांचे विचार, तर्क आणि सूचनांवर चर्चा व्हावी यासाठी इतका जास्त वेळ दिला गेला. हे सदन भारताच्या १४० कोटी नागरिकांच्या सार्वभौमत्वाचं प्रतीक आहे. त्यामुळे प्रत्येक सदस्य नियमांनुसार आणि विषयाच्या प्राधान्यानुसार निवेदन देईल, याकडे आपण लक्ष दिल्याचं बिर्ला म्हणाले. बिर्ला यांच्या निवेदनानंतर दुपारी २ वाजेपर्यंत लोकसभेचं कामकाज तहकूब करण्यात आलं.

राज्यसभेत आज जम्मू आणि काश्मीरचे माजी मुख्यमंत्री फारुख अब्दुल्ला यांच्यावरच्या हल्ल्याची सखोल चौकशी केली जाईल, असं आश्वासन सभागृह नेते जे. पी. नड्डा यांनी दिलं.

राज्यसभेतले विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खर्गे यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला ते उत्तर देत होते. सरकार हे प्रकरण अतिशय गांभीर्याने घेत असून त्याचा सखोल तपास व्हावा यासाठी वचनबद्ध आहे. त्यामुळे अब्दुल्ला यांच्या संरक्षणासाठी आवश्यक असलेल्या सर्व उपाययोजना सरकार करेल, असं नड्डा म्हणाले. तसंच विरोधकांनी या घटनेला राजकीय रंग देण्याचा प्रयत्न केला आहे, अशी टीकाही नड्डा यांनी केली.

**<><><><>**

जम्मू काश्मीरचे माजी मुख्यमंत्री आणि नॅशनल कॉन्फरन्स पक्षाचे अध्यक्ष फारुख अब्दुल्ला काल एका हल्लेखोराने केलेल्या गोळीबारातून सहीसलामत बचावले. अब्दुल्ला जम्मू इथं एका विवाहसोहळ्याला गेले असताना ही घटना घडली. हल्लेखोराला पोलिसांनी पकडलं असून त्याची ओळख पटली आहे. ६३ वर्ष वयाचा आरोपी कमाल सिंग जामवाल याने पोलिसांना सांगितलं की, तो गेली २० वर्ष अब्दुल्ला यांच्यावर हल्ला करण्याची संधी शोधत होता. त्याच्याजवळून पिस्तुल जप्त केलं असून, पुढचा तपास सुरु आहे.

**<><><><>**

सरकार स्वयंपाकाच्या गॅसची आयात सुरळीत करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करत आहे असं भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशननं म्हटलं आहे. एलपीजी सिलिंडरच्या वाटपात घरगुती पुरवठ्याला सर्वोच्च प्राधान्य देण्यात आलं आहे. एलपीजी पुरवठ्यासाठी आलेल्या इतर विनंतींवर सध्या भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन, इंडियन ऑइल कॉर्पोरेशन आणि हिंदुस्तान पेट्रोलियम कॉर्पोरेशनच्या कार्यकारी संचालकांचा समावेश असलेल्या संयुक्त समितीद्वारे आढावा घेतला जात असल्याचंही कंपनीनं म्हटलं आहे.

**<><><><>**

ऐतिहासिक दांडी यात्रेत सहभागी झालेल्या सर्व स्वातंत्र्यसैनिकांना उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज अभिवादन केलं. १९३०मध्ये महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली आजच्याच दिवशी सुरू झालेली दांडी यात्रा हा भारताच्या स्वातंत्र्यलढ्यातला एक निर्णायक क्षण होता. या चळवळीने देशात स्वावलंबनाची भावना निर्माण केली. हेच स्वावलंबन आता आत्मनिर्भर आणि विकसित भारताच्या वाटचालीत मार्गदर्शक ठरल्याचं उपराष्ट्रपतींनी आपल्या समाज माध्यमावर म्हटलं आहे. सत्याच्या

मार्गावर ज्या विभूतींनी आनंदाची अनुभूती घेतली त्याच सत्याची जाणीव ठेवून आपल्याला मार्गक्रमण करायला हवं असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी समाज माध्यमावर म्हटलं आहे.

<><><><><>

शेतीमधे, बियाणं पेरण्यापासून ते पीक प्रक्रीयेपर्यंत महिला महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात, त्यांचा सहभाग धोरणनिर्मितीत वाढायला हवा असं प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केलं आहे. शेती आणि अन्न प्रणालीत महिलांची भूमिका या विषयावर नवी दिल्ली इथं आयोजित आंतरराष्ट्रीय परिसंवादाला त्या संबोधित करत होत्या. शेती आणि संलग्न उपक्रमांमधे भरीव योगदान देणाऱ्या शेतकरी महिलांच्या कार्याची माहिती त्यांनी दिली. महाराष्ट्रातल्या राहीबाई पोपेरे यांच्या बीज संरक्षण कार्याचा उल्लेख राष्ट्रपतींनी भाषणात केला.

**- - - होल्ड - बाईट - राष्ट्रपती - - -**

शेतकरी महिलांच्या सक्षमीकरणासाठी केंद्र सरकारने राबवलेल्या लखपती दीदी, डेरोन दीदी अशा विविध योजनांची माहिती राष्ट्रपतींनी दिली.

<><><><><>

अमेरिका - इस्राएल विरुद्ध इराण युद्धाचा आज १३वा दिवस आहे. दोन्ही बाजूंनी हल्ले सुरुच असल्यानं पश्चिम आशिया क्षेत्रात अद्याप संहार थांबलेला नाही. इराणचे राष्ट्राध्यक्ष मसूद पेजेश्कियान यांनी युद्ध थांबवण्यासाठी तीन अटी जाहीर केल्या आहेत. अल ज़जीरा या दूरचित्रवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत त्यांनी सांगितलं की, इराणच्या कायदेशीर हक्कांचं संरक्षण, युद्धात झालेल्या नुकसानीची भरपाई आणि भविष्यात हल्ला होणार नाही अशी आंतरराष्ट्रीय हमी मिळाली तर इराण तात्काळ युद्ध थांबवायला तयार आहे. मात्र ही तयारी म्हणजे इराणची कमजोरी असल्याचा समज करुन घेऊ नये, असं त्यांनी स्पष्ट केलं आहे.

युद्ध थांबवण्याची योग्य वेळ अद्याप आली नसल्याचं अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रंप यांनी म्हटलं आहे. केंटकी इथं एका सभेत त्यांनी सांगितलं की युद्धात अमेरिकेचा विजय झाला आहे, मात्र मिशन पूर्ण होईपर्यंत लढाई संपणार नाही असं ते म्हणाले.

या युद्धावर पहिल्या ६ दिवसात अमेरिकेचे ११ अब्ज ३० कोटी डॉलर्स खर्च झाले असल्याचं अमेरिकन संरक्षण मंत्रालय पेंटागॉनने तिथल्या संसदेत सांगितलं.

<><><><><>

परराष्ट्र मंत्री डॉ. एस जयशंकर आणि इराणचे परराष्ट्र मंत्री अब्बास अराघची यांच्या झालेल्या चर्चेनंतर इराणने भारताचे ध्वज असलेल्या दोन तेलवाहू जहाजांना होर्मुझच्या सामुद्रधुनीतून जाण्याची परवानगी दिली आहे. पुष्पक आणि परिमल ही दोन्ही जहाजं होर्मुझमधून प्रवास करून भारतात येतील. पश्चिम आशियातल्या संघर्षामुळे भारताची २८ जहाजं होर्मुझच्या सामुद्रधुनीच्या परिसरात थांबून आहेत. या जहाजांवर सुविधा पुरवणं आणि सुरक्षितता यांवर संबंधित अधिकारी लक्ष ठेवून आहेत.

<><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या आसाममधे गुवाहाटी येथून प्रधानमंत्री किसान सन्मान योजनेचा २२ वा हप्ता वितरित करणार आहेत. केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिंग चौहान यांनी आज नवी दिल्लीत ही माहिती दिली. प्रधानमंत्र्यांच्या हस्ते उद्या १८ हजार ६४० कोटी रुपये थेट देशातल्या पात्र शेतकऱ्यांच्या खात्यात हस्तांतरीत करतील असंही त्यांनी सांगितलं. या योजनेच्या माध्यमातून आतापर्यंत ४ लाख २७ हजार कोटी रुपये शेतकऱ्यांना देण्यात आल्याचंही त्यानी म्हटलं आहे.

<><><><>

आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार अशी ओळख असलेले राज्याचे पहिले मुख्यमंत्री दिवगंत यशवंतराव चव्हाण यांच्या ११३ व्या जयंतीनिमित्त आज राज्यात विविध कार्यक्रम आयोजित करण्यात येत आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या समाजमाध्यमावरच्या पोस्टमध्ये यशवंतराव चव्हाण यांना अभिवादन केलं आहे. उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी कराड येथील प्रीती संगमावर जाऊन त्यांच्या समाधीचे दर्शन घेऊन अभिवादन केलं.

<><><><>

भारतीय क्रिकेट नियामक मंडळ अर्थात बीसीसीआयनं इंडियन प्रीमियर लीग अर्थात आयपीएल स्पर्धेच्या पहिल्या टप्प्याचं वेळापत्रक काल जाहीर केलं. २८ मार्च ते १२ एप्रिल २०२६ दरम्यान ही स्पर्धा होणार आहे. पहिला सामना २८ मार्च रोजी बेंगळुरूमधील एम. चिन्नास्वामी मैदानावर गतविजेता रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरू आणि सनरायझर्स हैदराबाद (एसआरएच) यांच्यात होणार आहे. त्यानंतर २९ तारखेला मुंबईत वानखेडे स्टेडियमवर मुंबई इंडियन्सचा सामना कोलकाता नाईट रायडर्सशी होईल. बेंगळुरू, मुंबई, गुवाहाटी, न्यू चंदीगड,

लखनौ, कोलकाता, चेन्नई, दिल्ली, अहमदाबाद आणि हैदराबाद या १० ठिकाणी एकूण २० सामने खेळवले जातील, असं बीसीसीआयनं म्हटलं आहे.

**<><><><><>**

अमेरिकेत सुरू असलेल्या एटीपी मास्टर्स १००० टेनिस स्पर्धेत भारताच्या युकी भांब्री यानं आपला स्वीडिश जोडीदार गोरान गोरॅन्सन याच्यासह पुरुष दुहेरीच्या उपांत्य फेरीत प्रवेश केला.

//<><><><><>//